कार्यालय परिपत्रक क्र ५०

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
प्रशासन विभाग
दिनांक : ६/०३/२०२४

**विषय :-** माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१८/प्र.क्र. ४५/ कार्या-६, मंत्रालय मुबई-४०००३२, दि.२६/११/२०१८

२) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे दि. ०५/ ०३/२०२४ रोजीचे आदेश.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. मध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या परिणामकारक अंमलबजावणीकामी विविध विभाग व डेपो मधून अधिकारी/सेवकांना जनमाहिती अधिकारी म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहे. नागरिकांना अपेक्षित असणारी माहिती अवलोकनासाठी त्वरीत व सुलभपणे उपलब्ध व्हावी, परिवहन महामंडळाकडे मागणी अर्जांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने आणि कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी आठवडयातील प्रत्येक सोमवार किंवा सदर दिवशी सुट्टी आल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी ०३:०० वा. ते ०५:०० वा. या कालावधीत सर्व विभाग व डेपोतील जनमाहिती अधिकारी संबधित टेबलप्रमुख संबधित अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयात व्यक्तीश: उपस्थित राहून नागरिकांना त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत.

सदरची कार्यवाही करताना जनमाहिती अधिकारी यांनी खालील बाबींच्या अनुषंगाने दक्षता घ्यावयाची आहे.

१. सदर अभिलेख नागरिकांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणेसाठी संबधित जनमाहिती अधिकारी/संबधित अधिकारी/कर्मचारी यांनी प्रत्येक सोमवारी दुपारी ३:०० ते ५:०० या वेळेत पुर्ण वेळ आपले कामाचे ठिकाणी व्यक्तीश: उपस्थित राहावयाचे आहे.
२. नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यापुर्वी त्या नस्ती मधील सर्व कागदावर क्रमांक टाकणे आवश्यक आहे.
३. दर सोमवारी अभिलेख पाहण्यासाठी आलेल्या नागरिकांचे बाबतीत नागरिकांस अवलोकनासाठी अपेक्षित असलेले अभिलेख, अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिलेले अभिलेख यांची स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येऊन त्यासमोर नागरिकांचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमाक नमुद करुन त्यावर नागरिकांची स्वाक्षरी घेणेत यावी. सदर रजिस्टर हे त्या त्या विभाग व डेपोतील जनमाहिती अधिकारी यांचे नियंत्रणाखाली ठेवण्यात यावे.
४. या अभिलेखामधील कोणताही कागद / कागदपत्रे गाहाळ होणार नाहीत व त्यामधील कोणताही मजकूर खोडला किंवा बदलला जाणार नाही, याची पूर्णत: जबाबदारी जनमाहिती अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची राहील.
५. नागरिकांच्या मागणीनुसार जर अभिलेखे त्याच दिवशी उपलब्ध होऊ शकले नाहीत तर अशा प्रकरणी पुढील सोमवारी सदर अभिलेख नागरिकांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत.
६. नागरिकांना अपेक्षित असलेले अभिलेख अवलोकन करुन झाल्यानंतर त्वरीत संबधित टेबलप्रमुख संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सुपूर्त करावयाचे आहेत.
७. अभिलेख अवलोकनासाठी ठरवून दिलेल्या वेळी एकापेक्षा जास्त नागरिक एकाच वेळी उपस्थित झाल्यास प्रथम येणाऱ्या नागरिकास प्रथम प्राधान्य याप्रमाणे अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

८. नागरिकांस अपेक्षित असलेल्या अभिलेखांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी सदर दिवशी रजेवर अथवा अन्य कारणास्तव कार्यालयात उपस्थित नसल्यास विभाग व डेपोतील अन्य अधिकारी/कर्मचारी यांनी नागरिकांशी समन्वये साधून त्यांच्या शंकांचे निरसन करावे.

९. महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या दराप्रमाणे नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी पहिला तास मोफत व त्यानंतर प्रत्येक पंधरा मिनिटांनी किंवा त्याच्या भागाला रूपये ५/- याप्रमाणे शुल्क आकारण्यात यावे.

१०. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ६(१),व कलम ४ ब नुसार अभिलेखांची पाहणी करण्यास मोबाईल अथवा इतर अत्याधुनिक साधनांचा वापर न करता अभिलेख उपलब्ध करून दयावेत.

वरील सुचनांची काटेकोरपणे दक्षतापुर्वक अंमलबजावणी सर्व जनमाहिती अधिकारी यांनी करावी. सर्व विभाग प्रमुख खातेप्रमुखांनी आपल्या नियंत्रणाखालील विभागाकडील जनमाहिती अधिकारी यांना याप्रमाणे कार्यवाही करणेकामी सूचित करावे. तसेच याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची खबरदारी सर्व विभागप्रमुख व खातेप्रमुख यांनी घ्यावयाची आहे.

(नितीन नार्वेकर)
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रत:-
सर्व खाते प्रमुख,
सर्व विभाग प्रमुख,
सर्व आगार व्यवस्थापक,
सर्व डिएमई,
आय.टी.विभाग